महाराष्ट्र शासन
वस्तू व सेवाकर विभाग
विशेष राज्यकर आयुक्त यांचे कार्यालय, ३ रा मजला, एच विंग, माझगांव,
मुंबई ४०० ०१०. दूरध्वनी क्र. ०२२ २३७६०३९०/०८७३/०३९२
ई-मेल आय डी- tatransfer2026@gmail.com

क्र. सराआ/ आस्था-५/ कर सहायक /विनंती बदली २०२६/ ब- 107 मुंबई दि. 06.03.2026

# परिपत्रक

**विषय : कर सहायक संवर्गाचे (गट-क) विनंती बदली २०२६ साठीचे आवेदन गुगल फॉर्मव्दारे ऑनलाईन पध्दतीने मागविण्याबाबत.**

**संदर्भ** : १. कर सहायक कर्मचाऱ्यांची विनंती बदलीसाठी या कार्यालयास हे परिपत्रक निर्गमित होईपर्यंत प्राप्त झालेली आवेदनपत्रे.

२. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदलीबाबत अधिनियम, २००५.

उपरोक्त विषयानुसार या कार्यालयास कर सहायक कर्मचाऱ्यांचे बदलीसाठी वेळोवेळी विनंती अर्ज प्राप्त होत असतात. बदलीसाठीचे निकष, रिक्त पदे, रिक्त पदांचा सर्वदुर समतोल, प्रशासकीय कारणे तसेच ३६० डिग्री छाननी समितीची शिफारस या बाबी विचारात घेऊन बदलीसाठी विनंती मान्य करण्यात येते.

यास्तव या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येत आहे की, विनंती बदलीसाठी विशेष राज्यकर आयुक्त/ राज्यकर आयुक्त कार्यालयास हे परिपत्रक निर्गमित होईपर्यंत प्राप्त होणारी सर्व आवेदनपत्रे या कार्यालयात दप्तरीदाखल करण्यात येतील.

वस्तू व सेवाकर विभागातील संपूर्ण महाराष्ट्रामधून प्राप्त होणाऱ्या कर सहायकांच्या विनंती अर्जांबाबत खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहे.

सर्वसाधारणपणे विनंती बदलीसाठी खालीलप्रमाणे अर्ज प्राप्त होतात-

i. क्षेत्रांतर्गत मध्यावधी विनंती बदली (६ वर्षे पूर्ण न झालेले)

ii. क्षेत्राबाहेरील (Zone Change) मध्यावधी विनंती बदली (६ वर्षे पूर्ण न झालेले)

कर सहायक विनंती बदली-२०२६ प्रक्रियेस होणारा विलंब टाळण्यासाठी, प्रक्रियेत पारदर्शकता, गतिशिलता आणण्यासाठी व टंकलेखनातील, नोंदणीतील मानवी चुका टाळण्यासाठी आवेदने (विनंती अर्ज) **गुगल फॉर्म (Google Form)** द्वारे ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहे.

कर सहायक विनंती बदली २०२६ करीता गुगल फॉर्मव्दारे आवेदने मागविण्यासाठीच्या सूचना सोबत जोडलेल्या परिशिष्ट १ व २ मध्ये देण्यात आलेल्या आहेत.

त्या अनुषंगाने विनंती बदलीस इच्छुक उमेदवारांनी विनंती बदलीकरीता गुगल फॉर्म मधील प्राधान्यक्रम निवडून आवेदन करणे बंधनकारक असेल. **केवळ गुगल फॉर्मव्दारे प्राप्त आवेदनांचाच कर सहायक विनंती बदली २०२६ करिता विचार करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.**

❖ महत्वाच्या सूचना:-

१. ज्या कर सहायक उमेदवारांनी हे परिपत्रक निर्गमित होण्यापूर्वी मध्यावधी विनंती बदली करीता लेखी स्वरूपात अर्ज योग्य मार्गाने मा.विशेष राज्यकर आयुक्त कार्यालय, मुंबई/मा.राज्यकर आयुक्त कार्यालय, मुंबई किंवा विभागाच्या कोणत्याही कार्यालयात सादर केले आहेत, अशा प्रकारचे अर्ज दप्तरी दाखल करण्यात येतील.सबब अशा अर्जदारांना पुन्हा अर्ज सादर करावयाचा असेल तर त्यांनी केवळ गुगलफॉर्म व्दारेच ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावा.

२. सदर गुगल फॉर्म ची लिंक आस्थापना अधिकारी यांना या कार्यालयातर्फे प्राप्त करून दिली जातील. विनंती बदली करीता अर्जदार दि. २०.०३.२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज करु शकतील.

३. गुगलफॉर्म व्दारेच ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केल्यानंतर ई-मेल आयडीवर प्राप्त अर्जाची पोचपावती योग्य मार्गाने (संबंधित आस्थापना अधिकाऱ्यांमार्फत) दि. २७.०३.२०२६ रोजीपर्यंत या कार्यालयास सादर करावी. अन्यथा कर सहायक मध्यावधी विनंती बदली-२०२६ प्रक्रियेअंतर्गत बदली करीता त्यांच्या विनंतीचा विचार केला जाणार नाही.

४. कर सहायक विनंती बदलीसाठी अर्ज केलेल्या कर सहायक कर्मचाऱ्यास वैयक्तीक किंवा इतर कारणास्तव विनंती अर्ज मागे घ्यावयाचा असल्यास त्यांनी दि. २३.०३.२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सहायक राज्यकर आयुक्त (आस्था-५), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाकडे tatransfer2026@gmail.com या ईमेल आयडीवर कळवावे.

**हे परिपत्रक वस्तु व सेवाकर विभागातील सर्व संबंधित राज्यकर सहआयुक्त/ आहरण व संवितरण अधिकारी/ आस्थापना अधिकारी यांनी त्यांच्या विभागातील संबंधित कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणुन द्यावे.**

आस्थापना अधिकारी त्यांच्याकडे आलेले सर्व अर्जाच्या पोचपावती **दि. २७.०३.२०२६** पूर्वी कार्यालयाच्या पत्रासह प्रमाणित करून सहायक राज्यकर आयुक्त कार्यालय (आस्थापना -०५) ला सादर करतील. **दि. २७.०३.२०२६** नंतर वस्तू व सेवा कर कार्यालयानी सहायक राज्यकर आयुक्त (आस्थापना-०५) कार्यालयास पाठविलेले आवेदन पत्रांची पोचपावती दप्तरी दाखल केल्या जातील व त्यांचा कर सहायक २०२६ विनंती बदलीसाठी विचार केला जाणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. **सदर परिपत्रक** mahagst.gov.in **या संकेतस्थळावर** what's new **या सदराखाली उपलब्ध करुन देण्यात आले आहे.**

**(मा.विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मान्यतेने)**

संजय निकम
राज्यकर सहआयुक्त (मुख्या-४)
महाराष्ट्र राज्य, मुंबई

सोबत- १.परिशिष्ट-१: गुगल फॉर्म व्दारे अर्ज मागविण्याची पध्दत
२. कर सहायक संवर्गाचे (गट-क) विनंती बदली २०२६ साठीचे आवेदन गुगल फॉर्मव्दारे ऑनलाईन पध्दतीने भरण्याबाबत सूचना
३. रिक्त पदांची यादी

प्रत सादर:- १. मा.राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. सर्व क्षेत्रीय अपर राज्यकर आयुक्त
३. सर्व राज्यकर सहआयुक्त (प्रशासन)
४. सर्व आस्थापना अधिकारी

## परिशिष्ट-१

## गुगल फॉर्म व्दारे अर्ज मागविण्याची पध्दत खालीलप्रमाणे :-

१. कर सहायक विनंती बदली २०२६ करिता बनविण्यात आलेली **Google Form** ची लिंक राज्यातील सर्व वस्तू व सेवा कर कार्यालयातील आस्थापना अधिकाऱ्यांना मेलद्वारे पाठवली जाईल.

२. आस्थापना अधिकारी कर सहायक विनंती बदली २०२६ अर्ज करु इच्छित कर्मचाऱ्यांकडुन गुगल फॉर्मची लिंक मिळणेबाबत लिखित अर्जाची प्रत प्राप्त झाल्यानंतर गुगल फॉर्मची लिंक संबंधित कर्मचाऱ्याच्या प्राधिकृत ई-मेल वर पाठवतील.

३. संबंधित लिंकद्वारे उमेदवार मोबाईलवर अथवा कॉम्प्युटरवर विनंती बदलीसाठी अर्ज करू शकतील.

४. कर सहायक २०२६ विनंती बदलीसाठी अर्जदार **दि. २०.०३.२०२६** रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पद्धतीने अर्ज करू शकतील. **दि. २०.०३.२०२६** रोजी Google Form द्वारे अर्ज स्वीकारण्याची लिंक सायंकाळी ५.०० वाजता बंद करण्यात येईल.

५. Google Form भरल्यानंतर उमेदवारांना नोंदणीकृत ई-मेल आयडीवर प्राप्त झालेल्या पोचपावतीची प्रत उमेदवार स्वयं-साक्षांकित करून आस्थापना अधिकाऱ्यांकडे तात्काळ जमा करतील.

६. संबंधित आस्थापना अधिकारी त्यांच्याकडे आलेले सर्व अर्जाच्या पोचपावती **दि. २७.०३.२०२६** पूर्वी कार्यालयाच्या पत्रासह प्रमाणित करून सहायक राज्यकर आयुक्त कार्यालय (आस्थापना - ०५) ला सादर करतील.

७. आस्थापना अधिकारी केवळ गुगल फॉर्म व्दारे भरलेल्या आवेदनांच्या पोचपावती कार्यालयाच्या पत्रासह प्रमाणित करून राज्यकर सहायक आयुक्त कार्यालय (आस्थापना - ०५) ला सादर करतील. अर्जदार सर्व कागदपत्रे PDF स्वरुपात गुगल फॉर्म सोबत अपलोड करुन कार्यालयास पाठविणार असल्यामुळे कोणत्याही स्वरुपाचे इतर कागदपत्र, लेखी अर्ज, विनंती बदली संबंधित वैद्यकीय कागदपत्रे कार्यालयास पाठविण्यात येऊ नयेत.

८. विनंती बदली करीता **गुगल फॉर्म (Google Form)** द्वारे आवेदन पत्रासह सादर करण्यात आलेली कागदपत्रे खोटी/बनावट अथवा शासनाची दिशाभूल करण्यासाठी फेरफार केली असल्याची बदलीच्या कोणत्याही टप्प्यात निदर्शनास आल्यास संबंधित उमेदवारावर म.ना.से नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

९. दि. **२७.०३.२०२६** नंतर वस्तू व सेवा कर कार्यालयानी " राज्यकर सहायक आयुक्त (आस्थापना-०५) कार्यालयास पाठविलेले आवेदन पत्रांची पोचपावती दप्तरी दाखल केल्या जातील व त्यांचा कर सहायक २०२६ विनंती बदलीसाठी विचार केला जाणार नाही.

१०. **कर सहायक विनंती बदलीसाठी अर्ज केलेल्या कर सहायक कर्मचाऱ्यास वैयक्तीक किंवा इतर कारणास्तव विनंती अर्ज मागे घ्यावयाचा असल्यास त्यांनी दि.२३.०३.२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत**

राज्यकर सहायक आयुक्त (आस्था-५), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाकडे tatransfer2026@gmail.com या ईमेल आयडीवर कळवावे.

**गुगल फॉर्मव्दारे अर्ज करण्याकरीता अर्जदारांना सूचना**

१. अर्जदारांनी गुगल फॉर्मची लिंक मिळणेबाबतचा लेखी अर्ज आस्थापना अधिकाऱ्याकडे सादर केल्यानंतर आस्थापना अधिकारी Google Form ची लिंक अर्जदाराच्या नोंदणीकृत इ-मेलवर पाठवतील.

२. उमेदवारांनी सदर लिंकद्वारे अत्यंत काळजीपूर्वक आवेदन सादर करावे.

३. एका नोंदणीकृत मेल आयडीद्वारे **एकदाच** अर्ज सादर करता येणार आहे, त्याच नोंदणीकृत इमेल-आयडीवर आपल्याला आवेदन Submit केल्यानंतर पोचपावती प्राप्त होईल. हि पोचपावती आवेदनकर्त्यांना त्यावर स्वाक्षरी करून संबंधित आस्थापना अधिकाऱ्यांकडे जमा करायची आहे.

४. **एकदा आवेदन Submit केल्यांनतर त्यात कोणत्याही प्रकारे बदल करता येणार नाही**, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

५. उमेदवारांनी आवेदनात खालील गोष्टींची पूर्तता अत्यंत काळजीपूर्वक करावी.
   - स्वतःचा नोंदणीकृत इमेल-आयडी
   - मोबाईल क्रमांक
   - सेवार्थ-आयडी
   - एम.पी.एस.सी. द्वारे निवडीचे वर्ष
   - गुणवत्ता यादी क्रमांक
   - वस्तू व सेवा कर विभागात निवडीचा दिनांक
   - सध्या कार्यरत असलेल्या कार्यालयात निवडीचा दिनांक
   - उमेदवारांना विनंती बदलीबाबत आवेदनात कमीत कमी १ व जास्तीत जास्त ३ वस्तू व सेवाकर कार्यालयांचे पर्याय देण्याची मुभा आहे. नियत बदलीस पात्र सर्व उमेदवारांनी दि.०९.०४.२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार नियत बदलीकरीता योग्य प्राधान्यक्रम निवडावेत.

६. विनंती बदली आवेदनास पूरक कागदपत्रे, वैद्यकीय अहवाल ( Covering letter मध्ये आजाराचा स्पष्ट उल्लेख असावा)इत्यादी सर्व कागदपत्रे एकाच PDF मध्ये Scan करून Google Form मध्ये DOCUMENTS TO BE ATTACHED लिंकद्वारे अपलोड करावे.

७. कागदपत्रांच्या PDF ची मर्यादा **१० MB** पेक्षा जास्त नसावी.

संजय निकम
राज्यकर सहआयुक्त (मुख्या-४)
महाराष्ट्र राज्य, मुंबई

# परिशिष्ट-२

## कर सहायक संवर्गाचे (गट-क) विनंती बदली २०२६ साठीचे आवेदन गुगल फॉर्मव्दारे ऑनलाईन पध्दतीने भरण्याबाबत सूचना

अर्ज सादर करण्यासाठी कर सहायक उमेदवारांना G-mail वर स्वतःचा ई-मेल आयडी असणे अत्यावश्यक आहे. एका ई-मेल आयडीवरून **केवळ एकच अर्ज** करता येणार आहे. तसेच आपण सादर केलेल्या ई-मेल आयडीद्वारे अर्ज Submit केल्यानंतर आपल्याला ई-मेल आयडीवर पोचपावती प्राप्त होणार. या पोचपावतीवर आपल्याला स्वाक्षरी करून अर्ज संबंधित आस्थापना अधिकाऱ्याकडे जमा करायचा आहे.

१. **Email Address :-** सर्वप्रथम ई-मेल ऍड्रेस (Email Address) या सदराखाली आपला ई-मेल नोंदवावा.(टीप - यात नोंदवलेल्या ई-मेलवर आपल्याला पोचपावती प्राप्त होईल.)
२. **श्री./श्रीम.**- नमूद करावे.
३. **कर्मचाऱ्याचे नाव:-** या सदराखाली कॅपिटलमध्ये आपले संपूर्ण नाव नोंदवावे.
   (आडनाव प्रथम) (e.g. TENDULKAR SACHIN RAMESH )
४. **जन्मतारीख :-** स्वत:ची अचूक जन्मतारीख (DD/MM/YYYY मध्ये) नोंदवावी. Eg. २०/०१/१९९०.
५. **Mobile Number :-** या सदराखाली आपला सध्याचा सुरु असलेला Mobile Number नोंदवावा. मोबाईल नंबर अचूक नोंदवणे आवश्यक आहे.
६. **कर्मचाऱ्याचा सेवार्थ ID:-** या सदराखाली आपला सेवार्थ ID नोंदवावा.
७. **सध्याच्या पदावर कार्यरत असलेले कार्यालय व ठिकाण :-** सध्या कोणत्या कार्यालयात कार्यरत आहे ते कार्यालय निवडावे. Eg. COMMISSIONER OFFICE, MUMBAI, NODAL-०३ AND AUDIT-०१.
८. **सध्याच्या पदावर रुजू झालेला दिनांक :-** (DD/MM/YYYY मध्ये) नोंदवावा. Eg. १५/१०/२०१७.
९. **आत्तापर्यंतच्या सेवेचा तपशील :-**
   १. प्रथम मागील नियुक्ती (कार्यालय व ठिकाण) :- कर्मचारी सध्या कार्यरत असलेल्या कार्यालयापूर्वी ज्या कार्यालयात कार्यरत होता, ते कार्यालय नोंदवावे.
   २. प्रथम मागील नियुक्ती कधीपासून (दिनांक) :- कर्मचारी सध्या कार्यरत असलेल्या कार्यालयापूर्वी ज्या कार्यालयात कार्यरत होता, त्या कार्यालयात ज्या दिनांकापासून रुजू झाला तो दिनांक DD/MM/YYYY मध्ये नोंदवावा.
   ३. द्वितीय मागील नियुक्ती (कार्यालय व ठिकाण) :- कर्मचारी प्रथम मागील नियुक्तीपूर्वी ज्या कार्यालयात कार्यरत होता, ते कार्यालय नोंदवावे.
   ४. द्वितीय मागील नियुक्ती कधीपासून (दिनांक) :- कर्मचारी प्रथम मागील नियुक्तीपूर्वी ज्या कार्यालयात कार्यरत होता, त्या कार्यालयात ज्या दिनांकापासून रुजू झाला तो दिनांक DD/MM/YYYY मध्ये नोंदवावा.
   ५. तृतिय मागील नियुक्ती (कार्यालय व ठिकाण) :- कर्मचारी द्वितीय मागील नियुक्तीपूर्वी ज्या कार्यालयात कार्यरत होता, ते कार्यालय नोंदवावे.

६. तृतिय मागील नियुक्ती कधीपासून (दिनांक) :- कर्मचारी द्वितीय मागील नियुक्तीपूर्वी ज्या कार्यालयात कार्यरत होता, त्या कार्यालयात ज्या दिनांकापासून रुजू झाला तो दिनांक DD/MM/YYYY मध्ये नोंदवावा.

१०. INV **(अन्वेषण शाखा)** काम करण्यास अनुत्सूक आहात का ? :- या सदराखाली होय/नाही असा पर्याय निवडावा.

११. यापूर्वी अन्वेषण शाखेत काम केले आहे काय ?:- या सदराखाली होय/नाही असा पर्याय निवडावा.

१२. अन्वेषण शाखेतला कालावधी:- या सदराखाली कर्मचाऱ्यांने लिपीक व कर सहायक या पदासाहित कालावधी नमूद करावा.

१३. **कर सहायकांचा मुंबई विभागातील (माझगांव/बांद्रा कार्यालयातील) सलग कालावधी. :-** या सदराखाली कर्मचाऱ्यांचा लिपिक/कर सहायक या पदावरच्या मुंबई विभागातील सलग कालावधीसह नमुद करावा.
**उदा.** क्ष हा कर्मचारी सन २०२० ते २०२३ पर्यंत शिपाई पदावर मुंबई विभागात कार्यरत होता. नंतर कर सहायक पदोन्नतीने २०२३ ते २०२६ पर्यंत मुंबई विभागात कार्यरत होता. तर क्ष ह्या कर्मचाऱ्याचा मुंबई विभागातील सलग कालावधी हा ६ वर्ष होईल.

१४.**कर्मचारी कोणत्या प्राधान्यक्रमांकात अंतर्भूत होतो याबाबतची माहिती :-** या सदराखाली १ ते ८ प्राधान्यक्रमांकापैकी जे प्राधान्यक्रम कर्मचाऱ्यास लागू होतात ते पर्याय निवडावे. जर कोणत्याही प्राधान्यक्रमात अंतर्भूत होत नसेल तर नववा पर्याय निवडावा.

१५, १६ & १७ **कागदपत्रांचे पुरावे -** कर्मचारी ज्या प्राधान्यक्रमात अंतर्भूत होतो त्या संबंधिची सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र किंवा कागदपत्रांचे पुरावे या सदरामध्ये फक्त PDF स्वरूपातच जोडावे. (PDF ची जास्तीत जास्त SIZE ही १० MB असावी. केवळ एकच PDF जोडता येवू शकेल.)

१८. **पसंतीक्रम :-** सर्वसाधारण बदली ज्या ठिकाणी हवी असेल त्या ठिकाणाचा/कार्यालयाचा पसंतीक्रम निवडावा. ०३ पसंतीक्रमापैंकी किमान ०१ पसंतीक्रम नोंदविणे आवश्यक आहे.

१९. **आपले नाव ०१.०१.२०२५ च्या अंतिम सेवाज्येष्ठता यादीमध्ये समाविष्ट आहे किंवा नाही.**

२०. **सेवाज्येष्ठता यादीतील अनुक्रमांक (०१.०१.२०२५ च्या अंतिम सेवाज्येष्ठता यादीनुसार) :-**

२१. **स्व-प्रमाणित घोषणापत्र :-** कर्मचाऱ्याने नोंदवलेली माहिती व कागदपत्रे ही खरी असून जर यामध्ये सादर केलेली कागदपत्रे खोटी/ बनावट व शासनाची दिशाभूल कर्ण्याकरीता फेरेफार केलेली आढळल्यास होणाऱ्या कार्यवाहीस कर्मचारी हा स्वत: जबाबदार असेल. अशा पध्दतीचे घोषणापत्र अर्ज करणाऱ्या कर्मचाऱ्याने देणे हे.अनिवार्य आहे.

२२. **कर्मचाऱ्याची स्वाक्षरी :-** कर्मचाऱ्याने अर्ज SUMBIT केल्यानंतर त्यांना सदर अर्जाची पोचपावती ही त्यांच्या अधिकृत Email ID वर मिळेल. INBOX मधून हा Email Open करून त्या पोचपावतीची (अर्जाची) PRINT काढून या सदरामध्ये स्वत:ची सही करावी व पोचपावती (अर्ज) आपल्या आस्थापना अधिकाऱ्याकडे जमा करावी. तसेच अर्जाच्या सोबत Upload करण्यात आलेल्या कागपत्रांच्या सत्यप्रती आस्थापना अधिकाऱ्यांना तपासणीकरीता सादर करावीत.

२३. **आस्थापना अधिकाऱ्याची स्वाक्षरी :-** कर्मचाऱ्यांनी आस्थापना अधिकाऱ्यांना पोचपावती सादर केल्यानंतर संबंधित आस्थापना अधिकारी यांनी अर्जाच्या सोबत Upload करण्यात आलेल्या कागपत्रांच्या सत्यप्रती तपासाव्या. त्यानंतर या सदरामध्ये स्वत:ची स्वाक्षरी करून केवळ ही पोचपावतीच राज्यकर सहायक आयुक्त

आस्थापना-५, माझगांव, मुंबई या कार्यालयात **दिनांक २७ .०३.२०२६ पूर्वी** सादर करावी.

२४. **विनंती बदलीपात्र कर सहायक सध्या कोणत्या परिक्षेत्रात कार्यरत आहेत:-** या सदराखाली नियत बदली पात्र कर सहायक मुंबई कार्यालयात कार्यरत असले तर **मुंबई** विकल्पाची निवड करावी आणि इतर परिक्षेत्रात कार्यरत असेल तर त्या कर सहायकांनी **मुंबई व्यतिरिक्त** इतर या विकल्पाची निवड करावी.

संजय निकम
राज्यकर सहआयुक्त (मुख्या-४)
महाराष्ट्र राज्य,मुंबई

## परिशिष्ट - ३

### कर सहायक संवर्गाची कार्यालयनिहाय रिक्त पदांची संख्या

| दि. २८.०२.२०२६ पर्यंतच्या कर सहायक संवर्गातील रिक्त पदांच्या माहितीचा तक्ता | | |
|---|---|---|
| विभाग | कार्यालय | रिक्त पदे |
| मुंबई | माझगांव,मुंबई | ३५७ |
| | वांद्रे,मुंबई | ४५ |
| | **एकूण** | **४०२** |
| **विभाग** | **कार्यालय** | **रिक्त पदे** |
| **ठाणे** | ठाणे शहर | ७४ |
| | भाईंदर | ४० |
| | पालघर | ८ |
| | **एकूण** | १२२ |
| **रायगड** | | |
| | कल्याण | ४९ |
| | अलिबाग | ८ |
| | रायगड | ७८ |
| | एकूण | १३५ |
| **पुणे** | पुणे | २६२ |
| | **एकूण** | **२६२** |
| **नाशिक** | नाशिक | ३५ |
| | मालेगांव | ९ |
| | अहिल्यानगर | २१ |
| | धूळे | ७ |
| | जळगांव | २४ |
| | नंदूरबार | ३ |
| | **एकूण** | **९९** |
| छ.संभाजीनगर | छ.संभाजीनगर | १८ |
| | जालना | १२ |
| | बीड | ४ |
| | लातूर | ४ |
| | परभणी | ० |
| | हिंगोली | २ |
| | नांदेड | २ |
| | धाराशिव | ० |
| | **एकूण** | **४२** |
| विभाग | कार्यालय | रिक्त पदे |
| | कोल्हापूर | ३५ |
| | सांगली | ०८ |
| | रत्नागिरी | ११ |

| | | |
|---|---|---|
| कोल्हापूर | ओरस | ८ |
| | सोलापूर | २२ |
| | बार्शी | २ |
| | सातारा | १४ |
| | **एकूण** | **१००** |
| नागपूर | नागपूर | ७८ |
| | वर्धा | ७ |
| | चंद्रपूर | ७ |
| | गडचिरोली | २ |
| | गोंदिया | ५ |
| | भंडारा | ५ |
| | अमरावती | ३ |
| | अकोला | ५ |
| | खामगांव | ८ |
| | यवतमाळ | ५ |
| | वाशिम | ० |
| | **एकूण** | **१२५** |

| विभाग | रिक्त पदे |
|---|---|
| मुंबई | ४०२ |
| ठाणे | १२२ |
| रायगड | १३५ |
| पुणे | २६२ |
| नाशिक | ९९ |
| छ.संभाजीनगर | ४२ |
| कोल्हापूर | १०० |
| नागपूर | १२५ |
| **एकूण** | **१२८७** |

वरील रिक्त पदे ही दि.२८.०२.२०२६ रोजीच्या स्थितीस अनूसरून असुन, यामध्ये सरळसेवा नियुक्ती , कर सहायक-२०२४ नियुक्ती ,वर्ग-४ ते कर सहायक पदावर पदोन्नती त्याचप्रमाणे विविध इतर पदांवर कर सहायक या पदावर निवड होऊन कार्यमुक्त होणे इ. विविध कारणास्तव संभाव्य बदल होऊ शकतो.

संजय निकम
राज्यकर सहआयुक्त (मुख्या-४)
महाराष्ट्र राज्य, मुंबई